Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY


**Multidisciplinary International E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (A)

# पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा



अतिथी संपादक :

**डॉ. इंद्रजित जाधव**

प्राचार्य,

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक संपादक :

**डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर**

मराठी विभाग प्रमुख

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :

**प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर**

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | A legendary Films and Film-Makers | Dr. Amina Khatun | 05 |
| 2 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | श्रीनिवास भणगे | 08 |
| 3 | चित्रपट सृष्टीला दृगोच्चर करणारी पटकथा | डॉ. तुकाराम रोंगटे | 13 |
| 4 | तमिळ चित्रपट : एक दृष्टीक्षेप | डॉ. ताहेर पठाण | 17 |
| 5 | कन्नड मराठी पटकथा आणि वास्तव | डॉ. श्रीपती रायमाने | 21 |
| 6 | पटकथा लेखन :एक परिचय | डॉ.प्रमोद भगवान पडवळ | 24 |
| 7 | ठाकर जीवनावरील पटकथा लेखन | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 31 |
| 8 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. भास्कर ढोके | 34 |
| 9 | चित्रपट माध्यम आणि आदिवासी सामाज वास्तव | डॉ. वैजनाथ अनमूलवाड | 40 |
| 10 | पटकथा लेखन प्रक्रिया | सुरेश मेहेर | 45 |
| 11 | कथा ते पटकथा | डॉ. सुनील खामगळ | 49 |
| 12 | ऐतिहासिक कादंबरी आणि पटकथा लेखन | प्रा.चांगुणा कदम | 57 |
| 13 | माहितीपटाची संकल्पना आणि स्वरूप | डॉ. महेबूब सय्यद | 59 |
| 14 | माहितीपट निर्मितीचे तांत्रिक स्वरूप | डॉ. नवनाथ येठेकर | 65 |
| 15 | पटकथा लेखनप्रक्रिया | डॉ. राजेंद्र खंदारे | 69 |
| 16 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. अनिल बांगर | 73 |
| 17 | पटकथा लेखन स्वरूप | डॉ. वंदना नढे | 78 |
| 18 | भारतीय प्रागतिक चित्रपट विशेष संदर्भ : 'काला' | मदन जाधव | 80 |
| 19 | पटकथालेखन : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. प्रमोद धिवार | 83 |
| 20 | नाटक, पटकथा : शैली आणि तंत्र | प्रा. प्रमोद पवार | 87 |
| 21 | पटकथा लेखन आणि नाट्यलेखन | प्रा.विकास बहुले | 91 |
| 22 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. शुभांगी बारवकर | 96 |
| 23 | लघुपट,माहितीपट आणि चित्रपट (सिनेमा) पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. अपूर्वा बेतकेकर | 98 |
| 24 | पटकथेतील व्यक्तीरेखाटन आणि संवाद स्वरूप विशेष | प्रा.अरविंद जाधव | 102 |
| 25 | पटकथा लेखन आणि नाट्य लेखन यातील साम्य-भेद | डॉ. एम. एम. बागुल | 106 |
| 26 | पटकथा लेखनाचे तंत्र | डॉ. हनुमंत भवारी | 110 |
| 27 | पटकथा लेखन प्रक्रिया | सायली जगताप | 113 |
| 28 | चित्रपट, लघुपट, माहितीपट | डॉ.उज्ज्वला भोर | 118 |
| 29 | पटकथा लेखन- एक कला | डॉ. केतकी भोसले | 122 |
| 30 | चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये कॅमेऱ्याचे महत्त्व | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 125 |
| 31 | पटकथा लेखनाचे तंत्र | प्रा.तुकाराम चव्हाण | 132 |
| 32 | पटकथा आणि इतर कला | प्रा.अमोगसिद्ध चेडके | 135 |
| 33 | मराठी चित्रपटसृष्टीची वाटचाल | डॉ.नारायण चौरे | 138 |
| 34 | पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप | डॉ.मधुकर बैकरे | 144 |
| 35 | साहित्यकृती व पारितोषिक प्राप्त चित्रपट | डॉ.सौ.मंगल डोंगरे | 147 |
| 36 | बाल नायकप्रधान श्यामची आई ते नाळ व्हाया टिंग्या : पटकथा लेखन | डॉ.दत्तात्रय डुंबरे | 151 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# पटकथा लेखनाचे तंत्र

डॉ. हनुमंत भवारी
श्री पद्ममणि जैन कला
व वाणिज्य महाविद्यालय, पाबळ
ता. शिरूर जि. पुणे.

**प्रास्ताविक—**

*पटकथा लेखनाची विविध तंत्र आहेत. मुळात पटकथा म्हणजे काय? हे आधी समजून घ्यायला हवे. एखाद्या साहित्यप्रकारातील साहित्यकृतीचे माध्यमांतर करण्यासाठी म्हणजेच कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र किंवा कविता यावर आधारित एखादा चित्रपट काढायचा असेल, तर त्या साहित्यकृतीवर वेगळे संस्कार करून ती कथा, कादंबरी किंवा इतर साहित्याची, चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी अनुकूल अशी कथा, तयार करावी लागते. त्या कथेस 'पटकथा' असे म्हणतात. पटकथेवर आधारितच नंतर संवादही लिहायचे असतात. त्यासाठीची मुळेही पटकथेतच पेरावी लागतात. पटकथालेखनासाठी अनेक गोष्टींची माहिती असावी लागते. ब—याच वेळा पटकथालेखक व संवादलेखक वेगवेगळे असतात. त्याचाही विचार पटकथालेखन करतांना करावा लागतो. आता नव्याने अनेक गोष्टीचे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्या सर्वांचे भान ठेवून पटकथाकार पटकथेची निर्मिती करत असतो. या सर्व तंत्रांचा आढावा खालील विवेचनातून घेतला आहे.*

**व्याख्या—**

"चित्रपटाची, म्हणजे चित्रपटनिर्मितीकरिता लिहिलेली कथा, ही 'पटकथा' हा या संज्ञेचा मूळ अर्थ. कालांतराने प्रसिद्ध चित्रपटांच्या निर्मितीनंतर त्यातले संवाद आणि कधी प्रसंग व वेध यांचे कालमान देणा—या पुस्तिकांचा, पुस्तकांचा उल्लेखही 'पटकथा' म्हणून केला जाऊ लागला." अरूण खोपकर.

"चित्रपट ही चलचित्रांद्वारे प्रेक्षकांना सांगीतलेली कथा, अशी चित्रपटाची एक व्याख्या केली जाते. ही कथा मूळ स्वरूपात एखादी लघूकथा, दीर्घकथा, नाटक, किंवा कादंबरीही असू शकते. चित्रपट या माध्यमाच्या मर्यादा आणि शक्तीस्थाने विचारात घेवून पटकथाकार त्या मूळ कथेचे पटकथेत रूपांतर करीत असतो. काहीवेळा मात्र पटकथा कुठल्याही साहित्यप्रकारावर अवलंबून नसून स्वयंभू असते." प्रभाकर पेंढारकर.

**तंत्र—**

चित्रपटाच्या सुरूवातीच्या काळाचा विचार केला तर असे जाणवते की, पटकथेला असे स्वतंत्र अस्तित्व नव्हते. चित्रपटाशिवाय ती अस्तित्वहीन होती. नाटकाच्या संहितेला जसे स्वतंत्र अस्तित्व असते. तसे पटकथेला असे स्वतंत्र अस्तित्व नव्हते. या संदर्भात अरूण खोपकर म्हणतात, "पटकथालेखन तंत्राविषयी अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. परंतु त्यातील अनेक पुस्तके ही अगदी प्राथमिक स्वरूपाची आहेत. चांगली पटकथा ही नेहमीच वाचनीय ठरेल असे सांगता येत नाही. या उलट वाचनीय पटकथा ही चांगल्या चित्रपटाला आधार देऊ शकेल, असेही सांगता येत नाही. दिग्दर्शकावर आणि निर्मात्यावर अवलंबून असणारा हा काहीसा परावलंबी लेखनप्रकार आहे"[३]

अरूण खोपकर यांच्या म्हणण्यानुसार पटकथेचे अस्तित्व खरे तर निर्माता व दिग्दर्शकाच्या मांडणीवर अवलंबून असते. चित्रपटामध्ये अनेक गोष्टींचा समन्वय साधावा लागतो. त्यामुळे व्यक्ती, कलाप्रकार, तंत्र, या सर्वांना एकत्र बांधालचे म्हणजे दिग्दर्शक व निर्माता यांचे कौशल्ये महत्वपूर्ण ठरते. त्यामुळे त्यांना तेवढी स्वायतता लागते. पटकथाकार हा कथा, कादंबरी, किंवा नाटक या साहित्यप्रकाराचे फक्त रूपांतर करतो की,

त्याची स्वत:ची प्रतिभा त्यामध्ये वापरतो. तिला स्वतंत्र कलामूल्य आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. खरं तर पटकथांची निर्मित चित्रपटासाठीच होते. स्वतंत्ररित्या पुस्तक रूपात त्या प्रसिद्ध झाल्याचे आढळत नाहीत. झाले असले तरी त्यांचे प्रमाण फारसे नाही. व त्यांना तेवढी लोकप्रियताही मिळालेली दिसत नाही. त्यामुळे त्याला थोडासा परावलंबी साहित्यप्रकार असे म्हटले जाते. या संदर्भात डॉ. राजेंद्र थोरात म्हणतात, " कथा ही कितीही दर्जेदार असली तरी ती स्वतंत्र पटकथेची गरज भागवू शकत नाही. पटकथाकार कथेवर आधारित स्वतंत्र पटकथा तयार करतो. साने गुरूजींच्या शामची आई या कादंबरीवर आचार्य अत्रे यांनी स्वतंत्र पटकथा लिहिली आहे"[४] तसेच संजय पाटील म्हणतात, "पटकथाकाराला दिग्दर्शकाची व दिग्दर्शकाला पटकथाकाराची व दोघांना प्रेक्षकांची नजर असणे महत्वाचे असते."[५] डॉ. थोरात व संजय पाटील यांच्या मतानुसार पटकथा ती स्वतंत्र तयार करावी लागते. एखादया नाटकावरून, कादंबरीवरून, मूळकथेवरून थेट चित्रपट बनवता येत नाही. तर त्याचे पटकथेत रूपांतर करणे खूप गरजेचे असते आणि ते करण्यासाठी संजय पाटील यांच्या म्हणण्यानुसार पटकथाकाराला दिग्दर्शकाची व दिग्दर्शकाला पटकथाकाराची व दोघांना प्रेक्षकांची नजर असावी लागते. तरच ती साहित्यकृती पटकथेच्या माध्यमातून, चित्रपटरूपाने प्रेक्षकांच्या पसंतीस उतरते.

स्वतंत्र अस्तित्व, संवादासंदर्भातील कल्पना, निर्मितीचा आराखडा, बोलकी दृश्ये, दिग्दर्शकासारखीच जाण, प्रसंग, प्रकाशयोजना, नटाचा स्वभाव, पटकथाकार व संवादलेखन, स्वतंत्र प्रतिभा, कॅमेरा, समीपदृश्य, संपादन वा दृश्यांची जुळवणी, ध्वनी, आवाज , कृष्णधवल , रंगीत, यंत्रसामग्री या व अशा अनेक गोष्टींची माहिती पटकथाकराला माहित असणे गरजेचे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता कथानकाचा आत्मा हरवता कामा नाही. याही गोष्टींची काळजी घ्यावी लागते. पूर्वी मूकपट होते, कोणत्याही स्वरूपाचा आवाज नसायचा. फक्त चित्र दिसायचे, त्यानंतर बोलपट आले, आवाज आला, त्यामुळे संवादाचे महत्व वाढले, ती जबाबदारी ही पटकथाकारावरच आली , ब–याव वेळा संवाद लेखन करणारा व पटकथाकार एकच असतो. त्यानंतर कॅमेरा विकसित झाला. पूर्वी एकाच ठिकाणाहून कॅमेरा प्रसंग चित्रित करत असे. त्यामुळे त्या चेह–यावरचे हावभाव दिसत नव्हते. पुल देशपांडे यांच्या व्याख्यानांचे काही व्हिडीओ आपल्याला तशा प्रकारचे पाहवयास मिळतात. समीपदृष्य, फोकर, केंद्रीकरण, प्रकाश योजना, अशा अनेक गोष्टींचे तंत्र पटकथाकराला पटकथा लिहितांना विचारात घ्यावी लागतात. परंतु हे सर्व करत असतांना मूळ कलाकृतीशी प्रामाणिक राहायला लागते.

या संदर्भात डॉ. अनिल सपकाळ, यांचे विचार महत्वपूर्ण आहेत ते म्हणतात, " साहित्य आणि चित्रपट यांच्यातील माध्यमांतरीत नवकृती पटकथा असते. शब्दांचा, भाषेचा वापर करून नव्या तंत्र माध्यमांसाठी पटकथेचे लेखन केले जाते. पटकथेचे साधनद्रव्य निश्चित असते. चित्रपट रचनेसाठी पटकथा आवश्यक असते. पटकथेच्या सांगाड्यावर चित्रपट साकार होतं असतो. चित्रपटाच्या दृश्य भाषेसाठी शब्द माध्यमातील पटकथा पाया असतो."[६] तसेच नागराज मंजुळे म्हणतात, " आशय अभिव्यक्तीच्या दृष्टीने साहित्य व सिनेमा ही दोन्ही माध्यमे मला जवळची आहे. साहित्यकृतीचे माध्यमांतर हे ओंजळीतून पाणी घेऊन येण्याचा प्रकार असून आशयाची गळती होऊ न देण्याची मोठी जबाबदारी दिग्दर्शकाची आहे."[७] डॉ. अनिल सपकाळ व नागराज मंजुळे यांचे वरील विचारही पटकथा लेखकाला व दिग्दर्शकाला फारच मोलाचा सल्ला देऊन जातात. त्याचा ही विचार त्यांना करावाच लागतो.

**समारोप–**

बदलत्या काळानुसार वाढते तंत्रज्ञान नक्षात घेता पटकथा लेखकाची जबाबदारी पूर्वीच्या तुलनेत खूप वाढली आहे. चित्रपटाच्या मर्यादा व बलस्थाने लक्षात घेऊन मूळ कथेचे रूपांतर पटकथेमध्ये करावे लागते. कधी

कधी तर कोणत्याही साहित्यकृतीचे माध्यमांतर न करता स्वतंत्र पटकथा ही लिहिली जाते. स्वतंत्र अस्तित्व, संवाद, आराखडा, लेखनप्रकार, बोलकी दृश्ये, दिग्दर्शकासारखीच जाण, प्रसंगज्ञान, प्रकाशयोजना, नटाचा स्वभाव, संवादलेखन, कॅमेरा, समीपदृश्य, संपादन वा दृश्यांची जुळवणी, ध्वनी, कृष्णधवल, रंगीत, नवीन यंत्रसामग्री या व अशा अनेक गोष्टींची माहिती असणे गरजेचे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करताना मूळ कथानकाचा आत्मा हरवत तर नाही ना?. याही गोष्टींची काळजी घ्यावी लागते.

**संदर्भ.**

१. अरूण खोपकर, पटकथा, मराठी वाङ्.मयकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
२. संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. १८८
३. प्रभाकर पेंढारकर, पटकथा, मराठी वाङ्.मयकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती
४. मंडळ, मुंबई, २००२, पृ. १८८
५. अरूण खोपकर, , पटकथा,मराठी वाङ्.मयकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती
६. मंडळ, मुंबई, २००२, पृ. १८८
७. साहित्यकृतीचे माध्यमांतर, राजेंद्र थोरात, साहित्यकृतीचे माध्यमांतर, संपा. डॉ. राजेंद्र
८. थोरात, संस्कृती प्रकाशन. २०१७.पृ. ३७
९. संजय पाटील, क–हाकाठ, अ. भा. म. सा. सं. २००४ पृ. १२८
१०.माध्यमांतरातील पटकथेचे स्थान, अनिल सपकाळ, साहित्यकृतीचे माध्यमांतर, संपा. डॉ.
११.राजेंद्र थोरात, संस्कृती प्रकाशन. २०१७ पृ. ३२
१२.प्रस्तावना, नागराज मंजुळे, साहित्यकृतीचे माध्यमांतर, संपा. डॉ. राजेंद्र थोरात, संस्कृती
१३.प्रकाशन. २०१७. पृ. ०७

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403